महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि./मान्यता/२०२५/ 1324
दिनांक : १७.०४.२०२५ 21 APR 2025

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी
औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यमान/प्रस्तावित नवीन संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या विद्यमान संस्थेतील फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया या शिखर संस्थांच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमाच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत**

**संदर्भ** :- १.फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली, यांची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मान्यता प्रक्रिये संदर्भात प्रसिध्द करण्यात आलेले परिपत्रक क्र.१४-५६/२०२४ पीसीआय (Approval Process for 2025-26 a.s.) /५०८० दि.१७.१२.२०२४

२. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-२०२४/प्र.क्र.४४०/तांशि-४ दि. १६.०४.२०२५

३. संचालनालयाचे पत्र क्र.०२/एनजीपी/मान्यतापीसीआय/२०२५/२३८ दि.१६.०१.२०२५

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी अधिसूचना /जाहीर सूचना/ परिपत्रकाव्दारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीच्या मान्यता प्रक्रियेसंदर्भातील अटी, शर्ती,मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिध्द केले आहे व त्या संबंधीचे Approval Process Handbook प्रसिध्द केले आहे. या शिखर परिषदांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या संस्थांतील अभ्यासक्रमाच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र / शासन मान्यतेकरिता खालीलप्रमाणे प्रस्ताव या विभागीय कार्यालयाकडे सादर करण्यात यावे.

**अ ) फॉर्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या अखत्यारीत येणाऱ्या अभ्यासक्रम/ संस्थांकरिता**

| अ.क्र | अर्जाचा प्रकार |
|---|---|
| १ | नविन बी.फार्मसी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे (New B.Pharmacy Institute) |
| २ | नविन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरु करणे (Introduction B.Pharmacy New Course) |
| ३ | संस्थेच्या नावात बदल करणे (Change in Name of Institution (applicable for B.Pharm)) |
| ४ | संस्थेचा पत्ता /ठिकाण बदल करणे (Change of Address / Location of Institution (applicable for B.Pharm)) |
| ५ | अभ्यासक्रम बंद करणे (Closure of course (applicable for B.Pharm)) |
| ६ | संस्था बंद करणे (Closure of Institution (applicable for B.Pharm)) |
| ७ | ट्रस्टच्या नावात बदल करणे (Change in Name of Trust (applicable for B.Pharm)) |
| ८ | नवीन डी फार्मसी अभ्यासक्रम / नवीन संस्था सुरु करणे (New D.Pharmacy Institute / Introduction of D.Pharmacy New Course) |

कृ.मा.प.

विद्यमान फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया या शिखर संस्थांच्या अधिपत्याखालील प्रस्तावित नवीन संस्था व विद्यमान संस्थांपैकी ज्या संस्था संदर्भीय अधिसूचना/जाहीर सूचना/ परिपत्रकानुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडे अर्ज करणार आहेत, अशा संस्थांनी शासनाची मान्यता/शासनाचे ना-हकरत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव दि.२२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारित केलेले नोंदणी शुल्क डी.डी व्दारे <u>SBI PUNE TREASURY</u> या नावे भरुन सदचा डी.डी व प्रस्ताव या विभागीय कार्यालयाकडे दि.२२.०४.२०२५ पर्यंत जमा करावे.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी निर्धारित केलेल्या मानकांप्रमाणे संस्थेकडे पूर्णपणे सद्यस्थितीत वापरायोग्य सोयीसुविधा असतील तसेच समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेली व सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे उपलब्ध असतील तरच संस्थांनी आपले प्रस्ताव विभागीय कार्यालयांकडे सादर करावेत. तसेच शासनाची मान्यता/ शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाची राहील यांची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४७५/४९२/४४२/४४३
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक :
क्रमांक: २/एनजीसी/मान्यतापीसीआय/२०२५ 236　　　　दिनांक : 16 APR 2025

प्रति,
प्राचार्य,
PCI या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील
अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यमान / प्रस्तावित नवीन संस्था,
महाराष्ट्र राज्य

विषय :-शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या विद्यमान संस्थेतील PCI नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत.....

संदर्भ :-१) फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मान्यता प्रक्रिये संदर्भात प्रसिध्द करण्यात आलेले परिपत्रक क्र. १४-५६/२०२४-PCI (Approval Process for २०२५-२६ a.s.)/५०८० dt. १७.१२.२०२४
२) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-२०२४/प्र.क्र.४४०/ तांशि-४, दिनांक १६.४.२०२५

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेतर्फे अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रका द्वारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या विद्यमान/नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीच्या मान्यता प्रक्रियेसंदर्भातील अटी, शर्ती, मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. शासनाच्या संदर्भाधीन पत्र क्रमांक २ अन्वये फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली या शिखर परिषदेकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मान्यता प्रक्रियेच्या परिपत्रकानुसार, नवीन संस्था सुरू करणे व विद्यमान संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे इत्यादीबाबत लागू असलेल्या प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासंदर्भातील प्रस्ताव स्विकारण्यास व त्यावर कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन कळविण्यात येते की, ज्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांनी पीसीआय कडे त्यांनी निर्धारीत केलेल्या विहीत मुदतीत अर्ज सादर केलेले आहेत अशा संस्थांनी पीसीआय कडे सादर केलेल्या अर्जाची प्रत संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करावी. त्यासोबत विद्यमान संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या वाढीस व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र /शासन मान्यतेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव संबंधित विभागीय कार्यालयांकडे दिनांक २२.४.२०२५ पर्यंत सादर करण्यात यावेत.

| | |
|---|---|
| १ | नविन बी.फार्मसी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे (New B.Pharmacy Institute) |
| २ | नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरु करणे (Introduction of B.Pharmacy New Course) |
| ३ | संस्थेच्या नावात बदल करणे [Change in Name of Institution (applicable for B.Pharm)] |

| | |
|---|---|
| ४ | संस्थेचा पत्ता / ठिकाण बदल करणे [Change of address / Location of Institution (applicable for B.Pharm)] |
| ५ | अभ्यासक्रम बंद करणे [Closure of course (applicable for B.Pharm)] |
| ६ | संस्था बंद करणे [Closure of the Institution (applicable for B.Pharm)] |
| ७ | ट्रस्टच्या नावात बदल करणे [Change in the Name of trust (applicable for B.Pharm)] |
| ८ | नवीन डी फार्मसी अभ्यासक्रम / नवीन संस्था सुरु करणे [New D.Pharmacy Institute / Introduction of D.Pharmacy New Course ] |

राज्यातील विद्यमान PCI शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील प्रस्तावित नवीन संस्था व विद्यमान संस्थांपैकी ज्या संस्था संदर्भीय अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रकानुसार PCI नवी दिल्ली यांचेकडे अर्ज करणार आहेत, अशा संस्थांनी शासनाची मान्यता/ शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क भरलेल्या पावतीसह तात्काळ संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करावा. तसेच उपरोक्त नमूद ८ बाबींव्यतिरिक्त इतर प्रकरणी (उदा.प्रवेशक्षमता वाढ/घट इ.) दिनांक २२.२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क विभागीय कार्यालयाकडे भरणा करुन प्रस्ताव सादर करावा.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या मानकांप्रमाणे संस्थेकडे पूर्णपणे सदय:स्थितीत वापरायोग्य सोयीसुविधा असतील तसेच समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेली व सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे उपलब्ध असतील तरच संस्थांनी आपले प्रस्ताव विभागीय कार्यालयांकडे सादर करावेत. तसेच शासनाची मान्यता/ शासनाचे ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर -त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील विद्यमान PCI या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील संस्थाना आपले स्तरावरुन अग्रेषित करावे.

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२०४०९३५
Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्र.मान्यता-२०२४/प्र.क्र.४४०/तांशि-४

दिनांक : १६ एप्रिल, २०२५

प्रति,

संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय:-फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील मान्यता प्रक्रियेच्या अनुषंगाने शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी प्रस्ताव स्विकारण्यास व त्यावर कार्यवाही करण्यास मान्यता देण्याबाबत...

संदर्भ:-आपले पत्र क्र.२/एनजीसी/पीसीआय/२०२५/१९८, दि.२४.०३.२०२५.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मान्यता प्रक्रियेच्या परिपत्रकानुसार, नवीन संस्था सुरू करणे व विद्यमान संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे इत्यादीबाबत लागू असलेल्या प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भातील प्रस्ताव स्विकारण्यास व त्यावर कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आपल्यास्तरावरुन पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

आपला,

सं.गु.खोरगडे

(संतोष खोरगडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) निवडनस्ती (तांशि-४)

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४७५/४९२/४४२/४४३
ई-मेल – desk2 @dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

तात्काळ

क्रमांक: २ /एनजीसी/ नवीन संस्था_अभ्यासक्रम/२०२५/२४० दिनांक : 16 APR 2025

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,छत्रपती संभाजीनगर,अमरावती,नागपूर

विषय: फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मानकाप्रमाणे नवीन संस्था/नवीन अभ्यासक्रम इ. सुरू करण्याबाबतच्या प्रस्तावांची काटेकोरपणे तपासणी करून प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र /शासन मान्यतेकरिता संस्थांचे प्रस्ताव संचालनालयास सादर करणे बाबत..

संदर्भ: १) फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मान्यता प्रक्रिये संदर्भात प्रसिध्द करण्यात आलेले परिपत्रक क्र. १४-५६/२०२४-PCI (Approval Process for २०२५-२६ a.s.)/५०८० dt. १७.१२.२०२४

२) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-२०२५/प्र.क्र.४२६/ तांशि-४, दिनांक १२.१२.२०२४

३)संचालनालयाचे पत्र क्रमांक २/एनजीसी/पीसीआय/२०२४/१०१२ ,दिनांक २७.१२.२०२४ व क्रमांक २/एनजीसी/पीसीआय/२०२५/१९८,दिनांक २४.३.२०२५

४) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-२०२४/प्र.क्र.४४०/ तांशि-४, दिनांक १६.४.२०२५

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रका द्वारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या विद्यमान/नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीच्या मान्यता प्रक्रिये संदर्भातील अटी, शर्ती, मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले होते. त्यास अनुसरून संचालनालयाने संदर्भीय पत्रे क्रमांक ३ अन्वये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी प्रस्ताव स्विकारण्यास शासन मान्यता देण्याची विनंती केली होती.त्यास अनुसरून शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक ४ अन्वये फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली या शिखर परिषदेकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मान्यता प्रक्रियेच्या परिपत्रकानुसार, नवीन संस्था सुरू करणे व विद्यमान संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे इत्यादीबाबत लागू असलेल्या प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासंदर्भातील प्रस्ताव स्विकारण्यास व त्यावर कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांनी पीसीआय कडे त्यांनी निर्धारीत केलेल्या विहीत मुदतीत अर्ज सादर केलेले आहेत अशा संस्थांच्या पीसीआय कडे सादर

केलेल्या अर्जाची तपासणी करुन ज्या प्रकरणी शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राकरीता तथा मान्यतेकरिता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्या प्रकरणी आपल्या विभागात प्राप्त होणा-या नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीना शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र/शासन मान्यता देण्यासंबंधीचे प्रस्तावावर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. तसे करताना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या प्राधिकरणाच्या निकषांची काटेकोर तपासणी करून त्यांची पूर्तता करणाऱ्या संस्थांच्या प्रस्तावांची शिफारस करण्यात यावी. तसेच ज्या संस्था निकषांची पूर्तता करीत नसतील अशा संस्थांच्या बाबत आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवून आपल्या नकारात्मक शिफारशींसह प्रस्ताव आणि एकत्रित यादी संचालनालयास सादर करावी.

१. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या जाहिरातीस अनुसरून विना अनुदान तत्वावर पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी दिनांक २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये नोंदणी शुल्क निर्धारीत केलेले आहे. त्यानुसार आपल्याकडे प्राप्त होणा-या प्रस्तावांच्या अनुषंगाने नोंदणी शुल्क संस्थेकडून जमा करुन घेण्यात यावे. ज्या संस्था नोंदणी / तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व त्यास संबंधित संस्था / ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील याची आपल्या स्तरावरुन संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

२. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या मान्यता प्रक्रिये संदर्भातील अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रकांमधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांना खालील प्रस्तावांसाठी आवश्यकतेनुसार शासन ना-हरकत प्रमाणपत्र / शासन मान्यता द्यावयाची आहे. करिता, या प्रस्तावांसाठी त्रिसदस्यीय समिती गठित करून समिती मार्फत प्रत्यक्ष तपासणी करुन आपले अभिप्रायासह संचालनालयास तात्काळ सादर करण्यात यावेत.

अ) फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या अखत्यारीत येणा-या अभ्यासक्रम/संस्थांकरीता

| | |
|---|---|
| १ | नविन बी.फार्मसी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे (New B.Pharmacy Institute) |
| २ | नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरु करणे (Introduction of B.Pharmacy New Course) |
| ३ | संस्थेच्या नावात बदल करणे [Change in Name of Institution (applicable for B.Pharm) ] |
| ४ | संस्थेचा पत्ता / ठिकाण बदल करणे [Change of address / Location of Institution (applicable for B.Pharm)] |
| ५ | अभ्यासक्रम बंद करणे [Closure of course (applicable for B.Pharm)] |
| ६ | संस्था बंद करणे [Closure of the Institution (applicable for B.Pharm)] |
| ७ | ट्रस्टच्या नावात बदल करणे [Change in the Name of trust (applicable for B.Pharm)] |
| ८ | नवीन डी फार्मसी अभ्यासक्रम / नवीन संस्था सुरु करणे [New D.Pharmacy Institute / Introduction of D.Pharmacy New Course ] |

३. परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावांची तपासणी करण्यासाठी आपल्या स्तरावर त्रिसदस्यीय तपासणी समिती नेमण्यात यावी. सदर समितीमध्ये स्थापत्य अभियांत्रिकी किंवा उपयोजित यंत्रशास्त्र किंवा आर्किटेक्चर विभागातील विभाग प्रमुख प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक अशा एका सदस्याचा समावेश करण्यात यावा. सदर समितीने फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या SIF २०२५-२६ मधील मानकांप्रमाणे जमिनीचे सर्व संबंधित कागदपत्रे, उदाहरणार्थ ७/१२ चा उतारा, सर्वे नं., बिगरशेती प्रमाणपत्र, लँड युज सर्टिफिकेट, सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले बांधकाम नकाशे, बांधकाम परवाना, बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र, अग्नी व सुरक्षा प्रमाणपत्र, स्ट्रक्चरल ऑडिटरचे प्रमाणपत्र इ. सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधित मूळ कागदपत्रावरुन प्रत्यक्ष करावी. त्यानुसार संबंधित जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा फार्मसी

कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या SIF २०२५-२६ मध्ये निर्धारीत केलेल्या विहित केलेल्या मानकानुसार सदर सोयी-सुविधा उपलब्ध असल्याबाबत तपासणी करुन समितीच्या व आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह या संचालनालयास सादर करण्यात यावेत. आपल्या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी शिफारस असलेले तसेच शिफारस नसलेले प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह संचालनालयास पाठविण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत प्रस्ताव आपल्या स्तरावर प्रलंबित ठेवण्यात येऊ नयेत.

४. उपरोक्त प्रस्ताव या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करतांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या मानकांप्रमाणे संस्थेकडे पूर्णपणे सदय:स्थितीत वापरायोग्य सोयीसुविधा असतील तसेच समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेली व सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे उपलब्ध असतील तरच आपल्या व समितीच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह व शिफारशीसह प्रस्ताव शासन मान्यतेस्तव संचालनालयास सादर करावा. शासन विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांबद्दल सजग असून संचालनालय स्तरावर किवा शासनस्तरावर प्रस्तावामध्ये कांही त्रुटी / वावगे आढळल्यास आपणास व समिती सदस्यांना व्यक्तिशः जबाबदार ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी व ही बाब समिती सदस्यांच्या आदेशात नमूद करून त्यांच्याही निदर्शनास आणून देण्यात यावी.

प्राप्त प्रस्तावांबाबत आपले स्तरावरुन कार्यवाही झाल्यानंतर संबंधित संस्थांचे प्रस्ताव, तपासणी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पदविका अभ्यासक्रमाचे प्रस्ताव कार्यासन क्रमांक १० आणि पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रस्ताव कार्यासन क्रमांक २ कडे खास दुतामार्फत या संचालनालयास निश्चितपणे दिनांक २४.४.२०२५ पर्यंत उपलब्ध करुन द्यावेत.

येथे नमूद करण्यात येते की, संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वयें शासनाने कळविल्यानुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांच्या मानकानुसार औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यमान पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास ,नवीन संस्था नवीन पदवी अभ्यासक्रमासह सुरू करण्यास , प्रवेश क्षमता वाढ इ.बाबत ज्या ज्या ज्या प्रकरणी शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असते त्या प्रकरणी शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केले जाते. सदर ना हरकत प्रमाणपत्र संस्थेद्वारे फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात येते. तदपश्चात फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया द्वारे त्या प्रकरणी कार्यवाही करुन मान्यता देण्यात येते. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया कडून मान्यता दिल्यानंतर संस्थेकडून शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यासाठी संचालनालयास प्रस्ताव सादर करण्यात येतो.

सदर विहीत प्रक्रियेनुसारच शासन मान्यता घेण्यात यावी अशा सूचना सर्व संबंधित औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यमान संस्था तसेच नव्याने मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणा-या संस्थांना देण्याचे शासनाने कळविले आहे ही बाब संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ , मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

F:\BUDAGE\2025-26\Apprvoal Process\Circular regarding New Institute_Course of PCI 2025_26.docx